The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यातील पर्यावरणीय मीमांसा

**प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले**
प्रमुख, पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग,
अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित, देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड. ४३१७१७

**प्रस्तावना:**

मराठी साहित्याचा आरंभ संत साहित्यापासून झालेला आहे. सृष्टीतील चराचर बाबींचे निर्देश संतकाव्यातून घडतात. संत ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील तिस-या अध्यायामध्ये “त्रिगुण असार निर्गुण हे सार । सारासार विचार हरिपाठ ॥ १ ॥ सगुण निर्गुण गुणाचे अगुण । हरिविण मन व्यर्थ जाय ॥ २ ॥ अव्यक्त निराकार नाही ज्या आकार । जेथुनि चराचर हरिसी भजे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी । अनंत जन्मानी पुण्य होय ॥ ४ ॥” केलेली मांडणी यादृष्टीने उद्बोधक आहे. म्हणूनच साहित्यात सजीव आणि निर्जीव बाबींचे महत्त्व, उपयोगिता, कार्यकारणभाव आणि एकंदरीत मानवी कल्याणासाठीची माहिती अधोरेखित केलेली आहे. या दृष्टीने संत कविता लोकोद्धाराच्या तळमळीने साकारली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यात येत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

संत साहित्याचे अवलोकन करणे.
संत साहित्यातील पर्यावरणपुरक माहिती अभ्यास करणे.
संत साहित्यातून विशद केलेला पर्यावरण आणि मानव यातील अनुबंध शोधणे.
संत साहित्यातील विज्ञाननिष्ठ जाणिवांच्या अभ्यासाकडे लक्ष वेधणे.

**शोधनिबंधाचे महत्त्व :**

साहित्य अभ्यासाचा दृष्टीकोनातून नवदृष्टी.
संत साहित्य अभ्यासाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास.
विज्ञान आणि साहित्य यांचा धांडोळा.

**शोधनिबंधाची गृहितके :**

मराठी साहित्याचा स्त्रोत म्हणजे संत साहित्य.
संतांनी विश्‍व कल्याणाचा विचार उद्धृत केला आहे.
संत साहित्यातून विज्ञानवादी जाणिवांची माहिती सहजता प्रकट झाली आहे.
संत कवितेतील विज्ञान सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत शोधानिबंधाशी संबंधित खालील संशोधन पद्धती वापरण्यात आलेल्या आहेत. आस्वादक संशोधन पद्धती, नमुना निवड संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती, मूल्यमापन संशोधन पद्धती इ.

**व्याप्ती आणि मर्यादा :**

प्रस्तुत विवेचन केवळ संतसाहित्य या कक्षेत होत आहे. मराठी भाषा आणि साहित्य या मर्यादे या निबंधात कथन करण्यात येत आहे. विषयाच्या मांडणीचा इतर साहित्य प्रवाह आणि प्रकारांशी संबंध दुरान्वये येईल. पण अभ्यासकांनी असा विचार येथे शोधू नये.

**पर्यावरणीय संकल्पना**

मराठी शब्दबंधातील पर्यावरण या शब्दाच्या व्याख्येनुसार सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात.[१] वैज्ञानिक पारिभाषिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान, इत्यादी सर्वांचा समावेश होतो. [२] मराठी विश्वकोशातील व्याख्येनुसार विशिष्ट वेळचे पर्यावरण म्हणजे शिलावरण, जलावरण, जीवावरण व वातावरण या मुख्य भूवैज्ञानिक घटकांतील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम होय.[३]

मराठी विश्वकोशानुसार सर्व सजीव व त्यांच्या भोवतीचे पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात. [४] सजीवांना त्यांच्या जीवनसंघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवालतच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते अथवा अनुकूल असे बदल करावे लागतात. सृष्टीतील काही सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात किंवा काही कारणास्तव बदलू शकत नाहीत, असे नष्ट होतात. ज्यांनी बदल स्वीकारला तेच तग धरून राहू शकतात. असे पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी परिवर्तनीय असतात.

**संतकाव्यातील पर्यावरणीय विचारधन :**

मराठी साहित्यात उगम काळापासून महानुभाव पंथ, वारकरी पंथ, नाथ पंथ, दत्ता पंथ, वीरशैव पंथ इ. जोरकसपणे साहित्य सृजन घडविले. त्यातून ओवी, अभंग, पद, विराणी, गौळण, भारुड, अख्यानकाव्य, दीर्घकाव्य आणि ग्रंथनिर्मिती साकारली. इ.स. १२ व्या शतकापासून यादवकाळ, बहामनीकाळ, शिवकाळ, पेशवाई आणि अंग्लकाल तथा आधुनिक काळात निर्माण झालेल्या संत कवितेतून पर्यावरणीय पडसाद उमटले आहेत. तसेच विविध पंथातील संतजणांनी सनातन प्रवृत्ती आणि धर्मातील अनिष्ट प्रथा परंपरांचे निर्दालन करण्यासाठी तथा धर्मप्रबोधनासाठी पर्यावरणातील दाखले आणि संदर्भांची रेलचेल केली आहे. त्यांचा ओघवता मागोवा पुढीलप्रमाणे.

“महानुभाव साहित्य हे मराठी साहित्याची गंगोत्री होय,” असे विधान अभ्यासकांनी केलेले आहे. या दृष्टीने महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी सांगितलेल्या विचारातून केसोबास, म्हाइंभट्ट, भास्कर भट्ट , गोविन्दप्रभू यांनी निर्मिलेल्या साहित्यातून दृष्टांतपाठ, सूत्रपाठ, लीळाचरित्र, सातीग्रंथ अथवा अन्य वाङ्मय निर्माण झाले. यात मानवाला उपदेश करण्यासाठी सृष्टीतील प्रतिमा, प्रतीके आणि घटना प्रसंग वापर केली आहेत. ‘तुमचेनि मुंगी रांड न होआवी’, ‘सशाला पारध्यापासून अभयदान’ अशा कित्येक संदर्भातून पर्यावरणीय उकल करता येते.

वारकरी सम्प्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, संत गोरोबा, संत सावता, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास इ. संतांनी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केलेले दिसते.

संत नामदेवांच्या अभंगातून पर्यावरण विचार सहजपणे प्रतिबिंबित झालेला दिसतो.

'मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दुध किती । सतरा रांजण भरुन गेले पेले बारा हत्ती ॥१॥
आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें ॥२॥
लटिकें गेलें कटकें तेथें गाडग्याएवढें राळें । उडत चिमणी चरत चाले तिचे वाटीएवढें डोळे ॥३॥
शेळी करी गुसळण तेथें मांजर काढी लोणी । उंदीर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी ॥४॥
पाण्यांत कासव गीत गाय वनांत कोल्हा नाचे । सावज मनीं संतोषला खोकड पुस्तक वाचे ॥५॥
कांतणी घरीं लग्न लागलें सरडा कणीक कांडी । बागूल वंध्या कण्या परणी घुबड मांडे रांधी ॥६॥
बाभूलीचें खोडीं माशानें केलें कोटें । सशाने सिंह ग्रासिला बेडुक आलें लोटें ॥७॥
विष्णुदास नामा म्हणे ऐका त्याची ख्याती । लटिकें म्हणतील त्यांचे पूर्वज नरका जाती ॥८॥

तसेच 'शिवरात्री महात्म्य' या रचनेतून पर्यावरणपूरक संदेश दिलेला आहे.

'तैसेचि येथे मृगाअंगी सत्व । वोपियेला जीव पारध्याशी
शिबीराजा जीव कापी नेटपाटे । सत्वाशी पालट होऊ नेली

संत नामदेवांनी 'तुळसी महात्म्य' या रचनेतून विज्ञाननिष्ठ विचारांची मांडणी केलेली दिसते.

तुळशीच्या दळी । यम जिंकला महाबळी
उभे वृंदावन जयाचिये द्वारी । होय तो श्रीहरी प्रसन्न तया
तुळसीचे रोप लावील जो आणोनि । तया चक्रपाणी न विसंबे
वानराच्या संगे स्वयें क्षेम देसी । मन ऋषिकेशी न बोलावे
रिसांपाशी सदा स्वभावे तुम्ही खेळा । माझिया कपाळा नातुडसी
पक्षी जटायूंचे लेकरू तू होसी । माझ्या का मनाशी नाउडसी'

अशाप्रकारे नामयाची अभंगवाणी पर्यावरणीय विचारांनी ओतप्रोत भरलेली आहे.

**संत ज्ञानेश्वर :-** संत ज्ञानेश्वरांच्या लेखनातून पर्यावरण विचार सर्वत्र पसरलेला दिसतो.

'हा तो त्यागं तरुवरु । जो का मोक्षफळे ये दोरी । सात्विक ऐसा गुरू । यासीची जगी ॥
जो खंडावया घावो घाली । का लावणी जयाने केली । दोघा एकची साऊली । वृक्ष दे जैसा ॥
वसंत तेथे वने । वन तेथे सुमने । सुमनी पालिंगणे । सारंगाची ॥
जैसा ऋतुप्राप्तीचे द्वार । वनश्री निरंतर । बोलगे फलभार । लावण्येशी ॥'

अशाप्रकारे ज्ञानेशांच्या लेखणीतून निरंतर वनश्री अवतीर्ण झालेली दिसते. तसेच 'पसायदान' (अध्याय - १८, ओवी -१७९३-१८०१) हे विश्वव्यापी कल्याणाचा आलेखच आहे. त्यातून 'दुरितांचे तिमिर जावो' अशी भावना अधोरेखित केलेली आहे. त्यांच्या हरिपाठातून 'हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण पै जाहला ॥' असे संत ज्ञानेश्वर विश्वबंधुत्वाची संकल्पना सकल लेखनातून मांडलेली दिसते. त्या दृष्टीने ही ओवी अतिशय प्रसिद्ध आहे. संत ज्ञानेश्वर स्थितप्रज्ञ साधूची लक्षणे सांगताना कल्पनेची उत्तुंग भरारी घेत संपूर्ण विश्वापर्यंत पोहोचतात. ज्ञानेश्वरीमध्ये 'सापांचे प्रकार' कथन केलेले आहेत. तेराव्या अध्यायात ओवी क्र. ७२५- अजगर, ओवी क्र. ७२६- फुरसे, अध्याय - १७ ओवी क्र. २४ - नाग अशी पर्यावरणीय संदर्भ आढळतात.

हे असो आघवी बोली / सांग पा सर्प पतीची साऊली
ते शीतल होईल केतुली/ मुषकाशी - साप -उंदीर संबंध, मासा - बगळा संबंध वर्णन
अध्याय १२ ओवी १११ मनुष्याला अभ्यास योगाने सर्प, व्याघ्र यावर हुकमत गाजवता येते.
महावृक्षावर अनेक पक्षांचे वास्तव्य (अध्याय ११/ ओवी २५८)
झाडाला आग लागली तर पक्षी सैरावैरा ( अध्याय १५ / ओवी २८८)
पक्षी फळाशी एकरुप होऊन रुची घेतात (अध्याय ५/ ओवी १३१)
अशा प्रकारे ज्ञानेश्वरीतील जैवविविधतेची यादी आपणास लक्षात घेता येते.

**संत एकनाथ :-**

गुरू सांगेन अवशेष । संख्याप्रमाण चोवीस । त्यांची नावे चोवीस । सावकाश सांगेन ॥
पृथ्वी वायू, आकाश । अग्नी आप सितांश । सातवा तो चांडयांश । कपोता परीस आठवाइ ॥
अजगर सिंधू पतंग । मधुभक्षिका गजभृंग । हरिणमीन वेश्या साइू । नवे सुभग पिंगळा ॥
टिटवी आणि लेकरू । कुमारी आणि शरकारू । सर्प कातीन पेश्करू । इतकेन गुरु चोवीस ॥
(सार्थ एकनाथी भागवत: संपा. केशव भिकाजी ढवळे, श्री समर्थ सदन मुंबई, आवृत्ती पहिली , १९२६ सोळावे पुनर्मुदण, १९९९, अध्याय-७, ओवी- ४६४९)

सूर्य- सूर्य काळे निजाकारिणी । रसेसहित शोधी पाणी । तोची वर्षाकाळी वर्षोनि । निववे जनी सहत्रदा ॥ (अध्याय- ७ , ओवी - ५३३) जेथे भूतदया अलौकिक । ते सकळ अरिच्छेदक । परमंगळ प्रकाशक । सुखदायी सर्वथा ॥ (अध्याय - ३०, ओवी - ९८) यापरि श्रोतकर्म विधान । या गार्थ पशुहनन । ते वानप्रस्थादी नाही जाण ।वानफळी यजन त्यागाचे ॥ (अध्याय - ३०, ओवी -१०८) अशा प्रकारे संत एकनाथांच्या कवितेमधून पर्यावरणाचे प्रतिबिंब अधोरेखित झालेले दिसते.

**संत तुकाराम :**

संत तुकाराम यांच्या अभंगातून निसर्ग आणि मानव यातील अनुबंध गुंफला आहे. पर्यावरण संगोपन आणि संवर्धनाचा संदेश दिलेला आहे.

'जन देव तरी पायाची पडावे । त्याचिया स्वभावे चाड नाही ॥
अग्नीचे सौजन्य शीतनिवारण । पालवी बांधून नेता नये॥',
'वृक्षवल्ली आम्हा सोयरे । वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती ॥',
'अणु रणिया थोकडा । तुका आकाशा एवढा',

वृक्ष,वेली, झाडे, अग्नी, शेती, अणू, रेणू, वनचरे, पशु पक्षी यांचे समाजाशी आणि सृष्टीतील नाते अभंगातून प्रकट झाले आहे.

**संत जनाबाई :** दैनंदिन व्यवहारातील सुलभ, सोपे संदर्भ देत जीवनातील सुख दुःख आणि परमार्थपर भावना जनाईने अभंगातून शब्दांकित केली आहे.

"झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी
पक्षी जाए दिगंतरा । बाळकासी आणी चारा
घार हिंडते आकाशी । चित्त तिचे पिल्लापाशी

तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा" अशा प्रकारे संत जनाबाईने सृष्टीतील दाखले देत तत्कालीन समाजमनावर पर्यावरणीय मुद्रा उमटवली आहे.

**सावता माळी**

"कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी
लसूण मिरची कोथिंबीरी अवघा झाला माझा हरी"

हरीच्या चिंतनातून भक्तीचा मळा फुलवताना निसर्ग प्रतिमा प्रतीके आणि रूपके साधलेली आहेत. वारीतील तुळशीवृंदावन रोपट्याचा सन्मान पर्यावरणीय दृष्टीने गर्दीला ऑक्सिजन पुरवते. त्यास शास्त्रीय परिभाषेत जुसशप झारिज्ञ यांनी दिंडीतील 'ऑक्सिजन सिलिंडर' म्हटले.

**सामाजिक पर्यावरण : ( Social environment)**

मानवाच्या सभोवतीचे सर्व मानवनिर्मित भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटक यांतील परस्परसंबंध आणि आंतरक्रिया यांतून तयार होणाऱ्या सर्वंकष आवरणास सामाजिक पर्यावरण असे संबोधण्यात येते. मानव नैसर्गिक व सामाजिक अशा दोन प्रकारच्या पर्यावरणात वावरत असतो. अर्थात सामाजिक पर्यावरण ही परिपूर्ण स्वतंत्र संकल्पना नसून ती नैसर्गिक पर्यावरणावर आधारित आहे. त्यामुळे स्थलकालपरत्वे तीत फरक आढळतो. नैसर्गिक पर्यावरण जसे गतिशील आहे, तसेच सामाजिक पर्यावरणही गतिशील आहे. त्यात सातत्याने बदल होत असतात.

सामाजिक पर्यावरणाचे भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय असे प्रमुख चार घटक मानले जातात. भौतिक घटकामध्ये निसर्गदत्त बाबींचा समावेश होतो. सामाजिक घटकामध्ये समाजाशी निगडीत सामाजिक संस्था आणि संबंधित सर्व घटक अंतर्भूत होतात. सांस्कृतिक घटकामध्ये समाजाच्या विविध क्षेत्रांतील संस्कृतिमय संचिताचा व कलाविष्कार यांचा समावेश होतो. राजकीय पर्यावरणात राष्ट्र आणि परराष्ट्रीय संबंध, राजकीय घटकाचा माहिती मिळते. मानव निर्मित घटकांची स्वअस्तित्वासाठी निर्मिती केलेली आहे. या सर्व घटकांमध्ये आंतरसंबंध असून त्यांच्यांत अगदी सूक्ष्म पातळीवरही आंतरक्रिया होत असतात. त्यातूनच मानवाला जीवन आवश्यक ऊर्जा, अन्न, वस्त्र, निवारा, अर्थ, साधनसामग्री, शक्ती, मानसिक स्वास्थ्य, सुख , समाधान व सन्मान मिळत असतात.

मराठी साहित्यात निसर्गचित्रणाएवढेच पर्यावरणही आहे; मात्र त्याचा आपण शोध घेतला पाहिजे. १२ व्या शतकात लिहिण्यात आलेल्या 'लिळाचरित्र' ग्रंथांत झाड, पशू, पक्षी यांच्यात समन्वय कसा राखावा ? त्यांचे जतन करावे, याचे यथोचित वर्णन आहे. संत एकनाथ, संत तुकाराम यांच्या प्रत्येक अभंगात निसर्गाविषयी माहिती आहे. ज्ञानेश्वरीच्या पानापानांत पर्यावरण आहे. समर्थ रामदासस्वामी यांनी 'बाग' या विषयावर दासबोधात वर्णन केले असून त्यात २८ समास पर्यावरणाला वाहिलेले आहेत. यात ३०० वृक्षांची माहिती आहे. त्यामुळे संतांच्या प्रत्येक साहित्यात पर्यावरणाविषयी सखोल माहितीवजा नोंदी सापडतात.

**निष्कर्ष :**

पर्यावरणीय संरक्षण ही मानवाची सर्वात महत्त्वाची सार्वकालिक गरज आहे.
संतांनी समाज प्रबोधन घडवून पर्यावरण रक्षणासाठी उपदेश केला.

## संत साहित्यातील पर्यावरणीय मीमांसा

**प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले**

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरण निकोप आणि सशक्त बनण्यासाठी संतांचे योगदान मोलाचे आहेच. त्यासोबतच भौतिक पर्यावरण रक्षणासाठी केलेला कृती आणि उक्तीयुक्त कार्य सदैव प्रेरणादायी आहे.

**समारोप :**

मराठी संत साहित्यातून पर्यावरण विचार झिरपत आलेला आहे. विज्ञान युग नसले तरी संत काव्यातून पर्यावरणविषयक जागृती करण्यासाठी संतांनी मूल्यात्मक कथन केले. विज्ञाननिष्ठ जाणिवांच्या अभ्यासाकडे समाजाचे लक्ष वेधले. वाचक आणि रसिकांना साध्या, सोप्या भाषेत पर्यावरणाचे धडे दिले. आरंभी पर्यावरणविषयक दृष्टीकोन अलीकडील काळातील साहित्यामध्ये जोपासना करीत साहित्यिकांनी लेखन केले. अनिता तिळवे यांच्या मताप्रमाणे, ''पर्यावरण या शब्दात पंचमहाभूतांना गवसणी घालण्याची क्षमता आहे. समर्थ रामदासस्वामी यांनी दासबोधात पृथ्वी, पाणी, उष्णता, आकाश, वनस्पती, अरण्ये यांचे सविस्तर वर्णन केले आहे. आपली संस्कृती निसर्गाशी एकरूप असणारी आहे; मात्र आज आपण या संस्कृतीचा ऱ्हास करत आहोत,'' हे स्पष्टपणे जाणवते. सद्यःस्थितीत पर्यावरणचे संतुलन ठेवणे ही मानवाची जबाबदारी आहे. कारण ह्या सृष्टीत निसर्गात मनुष्य हा इतर सजीवापेक्षा बुद्धिमान आहे. मानवाने विज्ञान, ज्ञान, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरणाला धोका निर्माण झालेला आहे. तो कमी करण्यासाठी समतोल सांभाळावा. प्रदुषण निर्माण होईल अशा बाबींचे व्यवस्थापन करावे. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून ५ जून हा जगभर पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

**संदर्भ : -** नामदेव गाथा: संत नामदेव : ( संचालक, शासकीय मुद्रणालय, व लेखनसामुग्री विभाग, मुंबई, म.शा. १९७०, पद क्र. १९३ (पृ. २२९) , पद क्र. ६०७, ६०४ व १४९८)

ज्ञानेश्वरी : संत ज्ञानेश्वर, संपा. किशन महाराज साखरे, श्री गुरु विनायक प्रक्षण कोल्हापूर, आवृत्ती- अठरावी, १९९१, अध्याय १८ ओवी - २०७, अध्याय १२- ओवी- १९९, अध्याय १८ ओवी - १६२५, अध्याय - ३ ओवी १००)

गजानन खोले : ज्ञानेश्वरांच्या वनश्रीतील पर्यावरण

डॉ कालिदास जोशी : ज्ञानेश्वरांचे प्राणिजात, (खंड- ६, अंक ८, बापरखुमा देवीवरू, वामनराव प्रकाशन पुणे, २००६)

संत तुकाराम : सार्थ श्री संत तुकाराम गाथा , संपा. विष्णुबुवा जोग, महाराज, केशव भिमाजी धावले, दहावी आवृत्ती, १९९७)

भावे विनोबा : अष्टादशी , ( परमधाम प्रकाशन पवणार, आ. ७, २०१६, पृ. ६२ )

**संत साहित्यातील पर्यावरणीय मीमांसा**

**प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले**